# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि255 /2020 दिनांक: 27 / 04/2020

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र . No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 17th April 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/-कावि 242 /2020 दिनांक 19.04.2020

## आदेश

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 13 मार्च,2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना *विषाणुमुळे* COVID-१९ नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2,3 व 4 ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरु करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अकोला जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्यामुळे आपतकालिन योजना करणे गरजेचे असल्यामुळे अकोला जिल्हायामध्ये संदर्भीय आदेश क्र. 8 अन्वये **दिनांक ०३.०५.२०२० चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. आणि**

**ज्याअर्थी** भारत सरकार यांचे अधिसूचना No.४०-३/२०२०-DM-I(A) दिनांक 15th April 2020 व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र . No. DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 17th April 2020 अन्वये **दिनांक** 03.05.2020 **पर्यंत लॉकडाऊन कालावधीमध्ये मार्गदर्शकतत्वे नमूद करण्यात आले आहेत. आणि**

**ज्या अर्थी, अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचे** संसंर्ग झालेले रुग्ण आढळून आल्या आहेत. त्यामध्ये बहुतांश रुग्ण हे जुन्या इतर आजाराने ग्रस्त असल्याचे निदर्शनास आले आहे. ज्यामध्ये दमा, खोकला, मधुमेह असे आजार आहेत. त्यामुळे अशा आजाराने ग्रस्त असलेल्या परंतू कोवीड -19 आजाराने ग्रस्त नसलेल्या व्यक्तींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

**त्या अर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला** , आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचना नुसार मला असलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव फैलाव होवू नये या करिता उपाययोजनेचा एक भाग म्हणून **खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.**

१. *शासकीय/खाजगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी आलेल्या वयाच्या ६० वर्षावरील व्यक्ती ( Senior Citizen) यांना जूने आजार जसे, दमा, खोकला, अस्थमा, मधुमेह, निमोनिया, किंवा इतर संसंगजन्य आजार आहेत अशा आजारी व्यक्तीं ( **प्रामुख्याने Containtment Zone मधील व्यक्ती** ) यांची शहरी भागाकरिता **आरोग्य अधिकारी**- महानगर पालिका, नगर परिषद क्षेत्रासाठी- **जिल्हा शल्य चिकित्सक** व ग्रामिण भागाकरिता- **जिल्हा आरोग्य अधिकारी**, जिल्हा परिषद यांनी अशा रुग्णांकडे विशेष लक्ष देवून त्या रुग्णांची आवश्यक माहितीची स्वतंत्र यादी तयार करून आपत्ती व्यवस्थापन कोरोना कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचेकडे त्वरेने सादर करावी.*

२. *कोवीड-१९ या आजाराने ग्रस्त नसलेले ( **NON-COVID**) रुग्ण परंतू ज्यांना जूने आजार असल्याचा इतिहास आहे अशा रुग्णांची नियमित तपासणी करण्यात यावी.*

३. *जे रुग्ण उपरोक्त आजाराने उपचाराकरिता रुग्णालयायमध्ये येतील अशा रुग्णांच्या मोबाईलमध्ये **आरोग्य सेतू** हे ॲप डाऊनलोड करुन ते कार्यान्वीत राहील या बाबत दक्षता घ्यावी.*

४. *अधीष्ठाता , शासकीय महाविद्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व यंत्रणांना अशा रुग्णांवर विशेष लक्ष ठेवण्याबाबत सूचित करावे. जेणे करुन अशा रुग्णांना कोरोना विषाणूचे संक्रमण होण्यापासून बचाव करता येईल.*

५. *सर्व संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांनी नागरीकांचे सुविधेकरिता* **Help line Number** *प्रदर्शित करणे अनिवार्य आहे.*

सदर आदेश आज **दिनांक 27 एप्रिल 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
5. अधीष्ठाता ,शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अकोला अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
6. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
7. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. तहसिलदार -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. प्रकल्प अधिकारी,नगर पालिका प्रशासन अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
10. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी , अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**